आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 04/08/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन > पिंपरी चिंचवड व पुणे > पान 4 > अंक 174 > RNI - MAHMAR /2021/51259 > metrocity924@gmail.com

# राज्याच्या शासकीय कार्यालयांना नवे स्वरूप – मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राज्य शासनाच्या विविध शासकीय विभागांच्या गतिमान आणि सुलभ कार्यपद्धतीच्या दृष्टीने एअर इंडिया इमारतीचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. नूतनीकरण करताना लोकाभिमुख प्रशासकीय रचनेला प्राधान्य देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे दिले.**




वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एअर इंडिया इमारतीसंदर्भातील सादरीकरण करण्यात आले, त्यावेळी त्यांनी संबंधितांना निर्देशित केले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह अन्य संबंधित वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, मुख्य सचिव यांनी याबाबत संबंधितांची एक बैठक घेऊन सविस्तर चर्चा करून सुयोग्य नियोजन करावे. विविध शासकीय विभागांतील कोणत्या विभागांचे स्थलांतर एअर इंडियाच्या नूतनीकरण इमारतीत करणे हे प्रशासकीय आणि नागरिकांच्या दृष्टीने सोयीचे ठरेल हे पाहावे. या ठिकाणी प्रशासकीय कार्यपद्धती ही सुलभ आणि लोकाभिमुख होईल यास प्राधान्य द्यावे. त्यानंतर याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, विकास चंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव (विशेष चौकशी अधिकारी) पंकज कुमार, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता प्रज्ञा वाळके; तसेच अन्य संबंधित वरिष्ठ अधिकारी, वास्तुविशारद उपस्थित होते. संभाव्य नूतनीकरण आराखड्यांचे सादरीकरण संबंधित वास्तुविशारदांद्वारे करण्यात आले.

# इयत्ता अकरावी प्रवेशासाठी 4 ऑगस्टपासून विशेष फेरी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : शैक्षणिक वर्ष 2026-27 साठीच्या इयत्ता अकरावी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत 15 लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून सुमारे 12.98 लाख विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश निश्चित केले आहेत. अद्याप काही विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित न केल्याने त्यांच्यासाठी 4 ऑगस्ट 2026 पासून विशेष फेरीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली आहे.**



विशेष फेरीअंतर्गत विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने किमान 10 कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरुन अर्ज लॉक करणे आवश्यक राहणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीक्रम आणि गुणवत्तेनुसार कनिष्ठ महाविद्यालयांचे वाटप करण्यात येणार आहे. या विशेष फेरीसाठी नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी तसेच भाग-1 मधील आवश्यक दुरुस्ती करण्याची सुविधा 4 ऑगस्ट रोजी सकाळी 10 वाजल्यापासून 6 ऑगस्ट रोजी सायंकाळी 6 वाजेपर्यंत उपलब्ध राहील. याच कालावधीत विद्यार्थ्यांना पसंतीक्रम भरुन अर्ज अंतिम स्वरुपात लॉक करता येणार आहे.

विशेष फेरीतील प्रवेश वाटप प्रक्रिया 7 ऑगस्ट रोजी पार पडणार असून 8 ऑगस्ट रोजी सकाळी 10 वाजता प्रवेश वाटपाची यादी पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित विद्यार्थ्यांना एसएमएसद्वारेही माहिती पाठविण्यात येणार आहे. प्रवेश वाटप झालेल्या विद्यार्थ्यांना 8 ऑगस्ट रोजी सकाळी 11 वाजल्यापासून 10 ऑगस्ट रोजी सायंकाळी 6 वाजेपर्यंत संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात आवश्यक कागदपत्र पडताळणी करून प्रवेश निश्चित करता येईल. त्यानंतर 11 ऑगस्ट रोजी दुपारी 1 वाजता रिक्त जागांची माहिती प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

दरम्यान, इतर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी आपला अर्ज मागे घेण्याचे आवाहनही शिक्षण संचालनालयाने केले आहे. विद्यार्थी, पालक तसेच कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी याची नोंद घ्यावी, तसेच प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळ mahafyjcadmissions.in तसेच हेल्पलाईन क्रमांक 8530955564 येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अतिधोकादायक इमारती व अतिक्रमणांवर तातडीने कारवाई-आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : शहरातील अतिक्रमण, फुटपाथवरील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे, हॉकर्स व्यवस्थापन, बांधकाम परवानगी, पाणीपुरवठा तसेच विविध विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यासाठी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.**



बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त विक्रम बगाडे, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर शहर अभियंता मनोज सेठिया, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, प्रेरणा सिंदकर, सुनिल भागवानी, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे आदींसह संबंधित विभागाचे अधिकारी आणि सर्व क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते.शहरात सध्या सुरु असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले. विशेषतः अतिधोकादायक इमारतींच्या संदर्भात कोणतीही जीवितहानी होऊ नये, यासाठी अशा इमारतींच्या मिळकतधारकांना तात्काळ नोटिसा बजावून इमारती रिकाम्या करण्याच्या सूचना द्याव्यात, तसेच आवश्यक ती पुढील कार्यवाही तातडीने करण्यात यावी, असे निर्देश डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

याचबरोबर शहरातील फुटपाथवरील अतिक्रमणे तातडीने हटवून पादचाऱ्यांसाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध करून द्यावा. हॉकर्स व्यवस्थापनाबाबत नियमानुसार कारवाई करावी. अनधिकृत बांधकामांवर प्रभावी कारवाई, बांधकाम परवानग्यांची नियमित पडताळणी, पाणीपुरवठा व्यवस्थेचे प्रभावी नियोजन तसेच विविध विकास प्रकल्पांची कामे निर्धारित वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचनाही आयुक्तांनी दिल्या.

त्यासाठी सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी नियोजन करून कोणत्याही परिस्थितीमध्ये नाल्यांचा मूळ प्रवाह बाधित होणार नाही आणि त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडणार नाही याची दक्षता घ्यावी. विविध ठिकाणी पाणी साचण्याच्या घटना घडण्याची शक्यता असते. त्याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींची तात्काळ दखल घेऊन त्याचवेळी कार्यवाही करावी. बांधकाम परवानगी, अग्निशमन परवानगी अशा विविध परवानग्या देण्याबाबतदेखील प्रशासकीय यंत्रणांनी नियमानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या.

नागरिकांना कचरा विलगीकरण मोहिमेमध्ये सहभागी करून घेणे आवश्यक आहे. ओला कचरा व सुका कचरा विलगीकरण करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक असून या दृष्टीने सर्व प्रशासकीय यंत्रणांनी नागरिकांना याबाबत अवगत करावे. ओला व सुका कचरा वेगळा करण्यासंदर्भात न्यायालयाचे आदेशही नागरिकांपर्यंत पोहोचवावेत, असे निर्देश आयुक्तांनी दिले.

# बेकायदा गॅस रिफिलिंगवर पोलिसांचा छापा परवान्याविना सुरु होता जीवघेणा व्यवसाय

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी: दक्षिण महाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी निघोजे येथील एका गॅस रिपेअरिंग सेंटरवर कारवाई करत घरगुती गॅस सिलिंडरमधून लहान टाक्यांमध्ये बेकायदा व धोकादायक पद्धतीने गॅस रिफिलिंग करणाऱ्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 2 ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास महिंद्रा कंपनीसमोरील सुभाषवाडी, निघोजे येथील 'ओमकार गॅस रिपेरिंग सेंटर' येथे छापा टाकण्यात आला. यावेळी आरोपी शिवराज विश्वनाथ शिवपुजे (वय 41) हा कोणताही वैध परवाना नसताना चार मोठे घरगुती गॅस सिलिंडर आणि दोन लहान सिलिंडरच्या साहाय्याने नॉझलद्वारे गॅसचे रिफिलिंग करत असल्याचे निदर्शनास आले.

गर्दीच्या वस्तीमध्ये ज्वलनशील गॅसचे अशा धोकादायक पद्धतीने रिफिलिंग केल्यामुळे परिसरातील नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

याप्रकरणी भारतीय न्याय संहिता तसेच जीवनावश्यक वस्तू कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला नोटीस बजावण्यात आली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास दक्षिण महाळुंगे एमआयडीसी पोलीस करीत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 04/08/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# वाहनचोरी रॅकेटचा पर्दाफाश;3 आरोपी जेरबंद,25 दुचाकी जप्त

## वाकड पोलिसांची धडाकेबाज कारवाई; 17 वाहनचोरीचे गुन्हे उघड

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

प्रतिनिधी :युनूस खतीब

**पिंपरी चिंचवड:वाकड पोलिसांनी वाहनचोरी विरोधात मोठी कारवाई करत तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्या ताब्यातून तब्बल 25 चोरीच्या दुचाकी जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील 15 आणि इतर भागातील 2 असे एकूण 17 वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.**




तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी 1 ऑगस्ट रोजी ज्ञानेश्वर शंकरराव जैस्वाल (रा. आळंदी) याला अटक केली. कसून चौकशीत त्याच्याकडून गेल्या दोन वर्षांत विविध ठिकाणांहून चोरी केलेल्या 23 मोटारसायकली जप्त करण्यात आल्या. त्यानंतर 2 ऑगस्ट रोजी वेदप्रकाश मदनसिंग रावत (रा. ताथवडे) याच्याकडून चोरीची ॲक्टिव्हा आणि संतोष मोहन मांगीलवाड (रा. वेणूनगर, वाकड) याच्याकडून चोरीची ज्युपिटर मोपेड जप्त करण्यात आली.

या कारवाईत वाकड, आळंदी, उत्तर चाकण, चाकण, संत तुकारामनगर, शिक्रापूर (पुणे ग्रामीण) आणि माणगाव (रायगड) पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील एकूण 17 गुन्ह्यांची उकल झाली आहे.

ही उल्लेखनीय कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली वाकड पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने केली.

# भरधाव आयशरची दोन महिलांना धडक

## वृद्धेचा मृत्यू, तरुणी गंभीर जखमी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी:पुणे-नाशिक महामार्गावरील नाणेकरवाडी येथे भरधाव आयशर ट्रकने रस्ता ओलांडणाऱ्या दोन महिलांना धडक दिल्याने 82 वर्षीय वृद्धेचा मृत्यू झाला, तर 24 वर्षीय तरुणी गंभीर जखमी झाली. या प्रकरणी चाकण दक्षिण पोलिसांनी ट्रक चालकाला अटक केली आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 2 ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे 6 वाजता 'प्रेमाचा चहा' हॉटेलसमोर पुण्याकडून चाकणकडे जाणाऱ्या मार्गावर ही दुर्घटना घडली. आरोपी इस्माईल रमजान अली (वय 23, रा. इंदूर, मध्य प्रदेश) हा आयशर ट्रक (एमएच 09 डीएफ 3237) भरधाव व बेदरकारपणे चालवत होता.यावेळी शांताबाई गंगाधर पांचाळ (वय 82) आणि राजश्री अशोक पांचाळ (वय 24) या दोघी पायी रस्ता ओलांडत असताना ट्रकने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात शांताबाई पांचाळ यांचा जागीच मृत्यू झाला, तर राजश्री पांचाळ गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी चाकण दक्षिण पोलिसांनी भारतीय न्याय संहिता तसेच मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करून ट्रक चालक इस्माईल रमजान अली याला अटक केली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सांगीडवार करीत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 04/08/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# नगरसेविका डॉ. सौ. कुंदा भिसे यांच्यातर्फे 800 नागरिकांना मोफत NCMC कार्डांचे वितरण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपळे सौदागर- नागरिकांना आधुनिक, सुलभ आणि डिजिटल सार्वजनिक वाहतूक सुविधांचा लाभ मिळावा या उद्देशाने नगरसेविका डॉ. सौ. कुंदाताई संजय भिसे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या मोफत NCMC (National Common Mobility Card) कार्ड वाटप शिबिराच्या दुसऱ्या टप्प्यात तब्बल 800 नागरिकांना NCMC कार्डांचे वितरण करण्यात आले.**




यापूर्वी आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या टप्प्यात 600 नागरिकांना NCMC कार्डांचे वाटप करण्यात आले होते. त्यामुळे दोन्ही टप्प्यांमध्ये मिळून एकूण 1,400 नागरिकांना या सुविधेचा लाभ मिळाला आहे. नागरिकांच्या वाढत्या प्रतिसादामुळे हे शिबिर अत्यंत यशस्वी ठरले. NCMC (National Common Mobility Card) हे 'वन नेशन, वन कार्ड' या संकल्पनेवर आधारित असून, या कार्डच्या माध्यमातून मेट्रो, बस तसेच भविष्यात विविध सार्वजनिक वाहतूक सेवांमध्ये एकाच कार्डाचा वापर करता येणार आहे. डिजिटल व्यवहारांना चालना मिळण्यासोबतच नागरिकांचा वेळ वाचणार असून तिकीट काढण्यासाठी रांगेत उभे राहण्याची गरज कमी होणार आहे. रोख व्यवहारांवरील अवलंबित्व कमी होऊन सुरक्षित, पारदर्शक आणि सुलभ प्रवासाचा अनुभव नागरिकांना मिळणार आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या डिजिटल इंडिया उपक्रमाला बळ देणारे हे कार्ड भविष्यातील स्मार्ट नागरी जीवनाचा महत्त्वाचा भाग ठरणार आहे.

शिबिरामध्ये पात्र लाभार्थ्यांना नियोजनबद्ध पद्धतीने कार्डांचे वितरण करण्यात आले. संपूर्ण प्रक्रिया सुरळीत व शिस्तबद्ध पार पडल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी नगरसेविका डॉ. सौ. कुंदाताई संजय भिसे म्हणाल्या, "नागरिकांना शासनाच्या आधुनिक आणि डिजिटल सुविधांचा लाभ घराजवळ उपलब्ध करून देणे, हीच आमची प्राथमिकता आहे. पहिल्या टप्प्यात 600 आणि दुसऱ्या टप्प्यात 800 अशा एकूण 1,400 नागरिकांना NCMC कार्डांचे वितरण करण्यात आले आहे.

नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ सहज आणि विनाअडथळा मिळावा यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. भविष्यातही नागरिकांच्या हिताचे आणि त्यांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारे उपक्रम राबवत राहू." नागरिकांच्या प्रश्नांवर तत्परतेने काम करत त्यांना शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी नगरसेविका डॉ. सौ. कुंदाताई संजय भिसे सातत्याने पुढाकार घेत असून, अशा लोकाभिमुख उपक्रमांमुळे परिसरातील नागरिकांकडून त्यांच्या कार्याचे स्वागत होत आहे.

# महापालिका शाळांमध्ये 'गुड टच – बॅड टच' जनजागृती करा – ऐश्वर्या तरस

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**महिला आणि लहान मुलींवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिका तसेच खासगी प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील सर्व विद्यार्थिनींसाठी 'गुड टच – बॅड टच' जनजागृती व प्रशिक्षण तसेच कराटे (स्वसंरक्षण) प्रशिक्षण सुरू करण्यात यावे, अशी मागणी नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी महापौरांकडे निवेदनाद्वारे केली आहे.**



निवेदनात म्हटले आहे की, सध्याच्या काळात महिला आणि अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटना चिंताजनकरीत्या वाढत आहेत. अशा घटनांना आळा घालण्यासाठी लहान वयापासूनच विद्यार्थिनींमध्ये योग्य-अयोग्य स्पर्शाची जाणीव निर्माण करणे आणि स्वसंरक्षणाची क्षमता विकसित करणे आवश्यक आहे.

यासाठी महापालिका आणि खासगी शाळांमध्ये महिला पोलीस अधिकारी, बालसंरक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ आणि समुपदेशक यांच्या माध्यमातून 'गुड टच – बॅड टच' विषयावर नियमित जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच प्रत्येक शाळेत विद्यार्थिनींसाठी नियमित कराटे व स्वसंरक्षण प्रशिक्षण सुरू करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, धैर्य आणि आपत्कालीन परिस्थितीत स्वतःचे संरक्षण करण्याची क्षमता विकसित करण्यावर भर द्यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील सर्व शाळांमध्ये हा उपक्रम तातडीने राबविण्याच्या सूचना संबंधित विभागांना द्याव्यात, अशी मागणी नगरसेविका ऐश्वर्या तरस यांनी महापौरांकडे केली आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968